आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८,क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,पुणे-४११००१
E-mail: cevt1.trti@gmail.com
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४

**जा.क्र./आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का.०४/४१००** **दि.१२/०९/२०२५**

**महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणानूसार सन २०२५-२६ करीता बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थेमार्फत राबविण्यात येणा-या स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत घेण्यात येणा-या संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षा पुर्व प्रशिक्षण कार्यक्रम- सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) संदर्भात...**

**-: महत्वाची सूचना :-**

सन २०२५-२६ करीता महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थामधून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देण्यासंदर्भातील योजनेच्या लाभासाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी बार्टी, पुणे मार्फत सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात येणार आहे. या करिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून त्या त्या संस्थानुसार घेण्यात येणाऱ्या योजनेच्या लाभासाठी दिनांक ३०/०८/२०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते.

त्यानुसार सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) दि.१४/०९/२०२५ ते दि.२७/०९/२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे. याबाबत सविस्तर वेळापत्रक तसेच प्रवेशपत्र (Admit card) बाबत माहिती दि.१०/०९/२०२५ रोजी बार्टी संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार दि.१४/०९/२०२५ व दि.१५/०९/२०२५ रोजी संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम-सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) आयोजित करण्यात आलेली होती.

तथापि दि. १४/०९/२०२५ व दि. १५/०९/२०२५ रोजी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम सामयिक प्रवेश परीक्षा (CET) देणाऱ्या उमेदवारांना ६ दिवस अगोदर परीक्षा केंद्राच्या शहराची माहिती उपलब्ध न झाल्याने **दि. १४/०९/२०२५ व दि. १५/०९/२०२५ रोजी होणाऱ्या संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - सामयिक प्रवेश परीक्षा (CET) पुढे ढकलण्यात येत आहेत. तसेच प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार दि. १६/०९/२०२५ते दि. २७/०९/२०२५ रोजी आयोजित ऑनलाईन परीक्षा निर्धारित वेळापत्रकानुसार घेण्यात येतील.**

**संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - सामयिक प्रवेश परीक्षा (CET) परीक्षेचे सुधारित वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

(चंचल पाटील)
**सहसंचालक,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**